सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला
संतोषी माता मंदिरामागे,हनुमान बस्ती,अकोला.

फोन न. 0724-2433834 **E-Mail - dietakola@maa.ac.in**

जा.क्र./शिक्षक अधिकारी कर्मचारी स्पर्धा/ 958 /2025 दिनांक : 30/10/2025

प्रति,
१. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
२. मा. जिल्हा क्रीडा अधिकारी (सर्व)
3. शिक्षणाधिकारी प्राथमिक, जि.प. (सर्व)
४. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जि.प. (सर्व)
५. तालुका क्रीडा अधिकारी (सर्व)
६. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)
७. प्रशासनाधिकारी,मनपा नपा, सर्व

विषयः- शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणेबाबत सुधारित पत्र.
संदर्भः- १.राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०.
२.राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४.
३.शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.१०/एसडी-६ मंत्रालय, मुंबई दि. १५ मार्च २०२४ (SQAAF)
४. मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे पत्र क्रमांक जा.क्र.साव्यावि/राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा /२०२५-२६/SCERT-33.0/36/2025-CPD
५. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे दिनांक १४/१०/२५ रोजीच्या ऑनलाईन सभेतील सूचना.
६. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र पुणे यांचे दिनांक २८/१०/२५ रोजीच्या ऑनलाईन सभेतील सूचना.
७. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र./शिक्षक अधिकारी कर्मचारी स्पर्धा/९२७/२०२५/ दि :- २८/१०/२०२५
८. मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे पत्र क्रमांक जा.क्र. राशैसप्रपम/साव्यावि/शिक्षक स्पर्धा २०२५/ दि:- २८/१०/२०२५.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन करण्यात येत आहे.

या स्पर्धांच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा ह्या एकूण **४२ विषयांवर** आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धांचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका ह्या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र. पुणे ह्या संस्थेच्या www.maa.ac.in ह्या संकेतस्थळावर उपयुक्तः या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन 2025- 26 वर्षापासून एकूण 42 स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व डायट कडून आयोजित करण्यात येणार

आहेत. याबाबत संबंधित डायट कडून मार्गदर्शक सूचना पत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.**वरील 42 स्पर्धांपैकी नाटक/नाट्य, भूमिका अभिनय, मूक अभिनय स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला** यांचेकडे देण्यात आलेली आहे.त्यानुसार या स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

नाटक/नाट्य, भूमिका अभिनय, मूक अभिनय स्पर्धा आयोजनाबाबत सूचना:-

संदर्भ पत्र क्रमांक चारच्या नुसार नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी म्हणजेच 7 नोव्हेंबर 2025 पासून राज्यस्तरीय वेळापत्रकाप्रमाणे प्रत्येक तालुका स्तरावर स्पर्धा घेण्याचे नियोजित आहे, त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. स्पर्धेसाठी नाव नोंदणी जिल्हा/राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.

२. केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंक वर नोंदवावे.

३. प्रत्येक स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.

४. स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची शिक्षकाची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकाकडे सादर करावी.

५. सर्व स्पर्धांसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केली जाईल. एका शिक्षकाला अनेक स्पर्धांमध्ये भाग घ्यावयाचे असल्यास आपल्या केंद्रातील इतर सर्व शिक्षकांनी भाग घेतला आहे, याची अगोदर खात्री करावी. त्यानंतरच एका शिक्षकाला अनेक स्पर्धांमध्ये भाग घेण्यास विचार करावा.

६. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठवली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे.

७. 31 ऑक्टोबर 2025 पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

८. वैयक्तिक तालुका स्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.

९. सांघिक क्रीडा विभागीय स्पर्धांसाठी प्रत्येक जिल्ह्यातून एक संघ निवडला जाईल जिल्ह्यातून एक उत्कृष्ट संघ किंवा तालुक्यामधून येणाऱ्या संघातील उत्कृष्ट खेळाडूंचा समावेश करून विभाग स्तरासाठी जिल्ह्याचा संघ तयार करता येईल.

१०. या स्पर्धांची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

११. तालुकास्तरावर वरील स्पर्धांची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी यांची राहील. गटशिक्षणाधिकारी यांनी तालुका क्रीडा अधिकारी व तालुकास्तरीय समितीच्या मदतीने तालुकास्तरीय स्पर्धा विहित वेळेत पार पाडाव्यात. तालुकास्तरावर DIET, अकोला येथील संबंधित तालुक्याचे संपर्क अधिकारी (वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता) हे तालुका समन्वयक म्हणून काम पाहतील. तसेच तालुकास्तरावर एका विषय साधन व्यक्तीची सहाय्यक समन्वयक म्हणून नियुक्ती करावी.

१२. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची नावे अंतिम करून डायटकडे बायोडाटा सह दिनांक 28/10/2025 पर्यंत पाठवावी तसेच स्पर्धेचे ठिकाणही कळवावे. परीक्षकांसाठी एससीईआरटी, पुणे कडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारित मानधन देण्यात येईल.

१३. स्पर्धेच्या नियमावली सोबत जोडलेल्या आयोजन समितीचे बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी व तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांनी, विभाग स्तर व राज्यस्तर स्पर्धांचे आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांनी एससीईआरटी पुणे कडील नियोजनानुसार करण्यात यावे. याबाबत आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

१४. नाटक/नाट्य/भूमिका अभिनय/मूक अभिनय या सदर स्पर्धेसाठी सादरीकरण हे वैयक्तिक स्वरूपात करावयाचे आहे. याची नोंद घ्यावी.(सांघिक स्वरूपात सादरीकरण होणार नाही)

१५. नाट्य/नाटक/भूमिका अभिनय/मूक अभिनय सदर स्पर्धेसाठी वेगवेगळे विषय असले तरी ही एकच स्पर्धा गृहीत धरून, तालुकास्तरावर यापैकी सर्वोत्कृष्ट एका स्पर्धकाची निवड करावी आणि त्यांना विभाग स्तरावर संधी द्यावी.

१६. सर्व स्पर्धा मध्ये परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील, परीक्षकांच्या निर्णयांना अयोग्य पद्धतीने व अकारण आक्षेप घेणे, स्पर्धेचे नियम मोडणे, पंचांच्या सूचना न पाळणे, स्पर्धेत अडथळा आणणे तसेच स्पर्धा बंद पाडण्याचा प्रयत्न करणे व अश्या कोणत्याही प्रकारचे बेशिस्त वर्तन करणाऱ्या स्पर्धकांना तत्काळ स्पर्धेतून बाद करावे.

१७. स्पर्धांसाठीचे परीक्षक व पंच हे शक्यतो शालेय शिक्षण विभागा बाहेरील असावेत, ज्या मुळे सर्वांना सहभागी होण्याची संधी मिळेल.

१८. आयोजित स्पर्धांमध्ये सध्या सेवेत कार्यरत असणारे नियमित, परीवेक्षाधीन व कंत्राटी शिक्षक आणि नियमित अधिकारी/कर्मचारी सहभाग घेऊ शकतील.

सोबत,

1. नाट्य नाटक भूमिका अभिनय मूक अभिनय स्पर्धा माहितीपत्रक व नियमावली.
2. तालुका, विभाग, व राज्यस्तर मुल्यांकन निकष प्रपत्र.
3. तालुका, विभाग, व राज्यस्तर निकाल प्रपत्र.
4. तालुका, विभाग, व राज्यस्तर प्रती स्पर्धा संभाव्य खर्च निकष व अंदाजपत्रक
5. संभाव्य स्पर्धा नियोजन/आयोजन.
6. जिल्हा व तालुकास्तर स्पर्धा आयोजन समिती.

Digitally signed by
Ratnamala Pandurang Khadke
Date: 31-10-2025 14:41:12

(श्रीमती रत्नमाला खडके)
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,अकोला

प्रत माहितीसाठी सविनय सादर

1.मा.संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे.
2.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, सर्व.
3.मा.आयुक्त, महानगरपालिका, सर्व.
4. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला.

२५) नाट्य/नाटक, भूमिका अभिनय व मूकाभिनय स्पर्धा

१) नाट्य /नाटक: नाटक हा शब्द अगदी बालपणापासूनच आपल्या कानावर पडतो, तो सोंग अथवा खोटेपणा या अर्थाने. पण हा खोटेपणासुद्धा खरा वाटावा असा असला तर त्याला नाटक म्हटले जाते. नाटक हा एक वाङ्मय प्रकार आहे; पण हा केवळ वाचनासाठी निर्माण झालेला नाही. हा दृक्श्राव्य (audio-visual) स्वरूपाचा वाङ्मय प्रकार आहे. नाटक म्हणजे शब्दांपासून तयार होणारी संहिता (script) आणि या संहितेचे सादरीकरण म्हणजे नाटक हे सादरीकरण नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना अभिनय इत्यादी घटकांच्या मदतीने करता येते. पण या सर्वघटकांची सुप्त शक्ती शब्दांनी तयार झालेल्या संहितेत असावी लागते. नाटक हे मूलतः सादरीकरणासाठी लिहिले जाते. वाङ्मय कला आणि सादरीकरण या दोन्ही अंगाने नाटक या कलाप्रकाराच्या अनेक व्याख्या देता येतात. त्यातल्या त्यात नाटक म्हणजे प्रसंग आणि संवाद यांच्याद्वारा व्यक्त होणारा संघर्षमय कथात्मक अनुभव अशी जास्तीत जास्त समावेशक व्याख्या आपणास सांगता येते. रचनेच्या दृष्टीने शोकात्मिका (Tragedy), सुखात्मिका (Comedy), प्रहसन (Farce) व मेलोड्रामा (Melodrama) हे नाटकाचे चार प्रकार पडतात.

२)भूमिकाभिनय: (Role Playing): भाषा अध्यापनाचे अविभाज्य अंग भूमिका अभिनय होय. भाषेच्या शिक्षकात कलावंताचे गुण असले पाहिजे. तो एक चांगला नट असला पाहिजे. शिक्षकांचे वागणे बोलणे, लिहिणे-वाचणे इतके परिणामकारक असले पाहिजे की अधिकांश कौशल्य त्यांच्या वर्तन-कृतीतून विद्यार्थ्यात संक्रमित व्हावे. भावपूर्ण वाचन, स्पष्ट उच्चार, मुद्राभिनय, आवाजातील चढउतार, हालचाल हावभाव या बाबतीत परीपूर्ण कौशल्य भाषा शिक्षकात असावी. नाट्य वाचन, कविता वाचन, कथा आदर्श वाचन शिक्षकाने प्रभावीपणे करावे.

भूमिकाभिनय पद्धतीचा अर्थ :एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी किंवा पाठातील मध्यवर्ती कल्पना विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यासाठी शिक्षक आपल्या विवेचनाला जेव्हा भूमिका अभिनयाची जोड देतो, तेव्हा त्या पद्धतीला भूमिकाभिनय पद्धती असे म्हणतात. भूमिकाभिनय पद्धती :भूमिकाभिनय पद्धतीत भूमिका व अभिनय या दोन तंत्राचा समावेश असतो. याला इंग्रजीत Role Play असे म्हणतात. नाटकाप्रमाणे भूमिकाभिनयात लिखित संवाद किंवा तयार संहिता नसते. भूमिकाभिनयात उत्स्फूर्त व समायोजित नाट्यीकरण असते. दुसऱ्याची भूमिका करणे म्हणजे भूमिकाभिनय करणे होय. या पद्धतीचा अध्ययन अध्यापनात वापर करून अनेक प्रसंग जिवंत करता येतात. भातुकलीचा खेळ व विद्यार्थी दिन ही भूमिकाभिनयाचेच उदाहरण होय. इतिहासातील शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका - (१३२) ३) विविध प्रसंग, मराठीतील कथानक याची निवड भूमिकाभिनयाकरिता करता येईल. पद्धतीचा योग्य वापर करून अध्ययन अध्यापनाचे कार्य शिक्षकाला प्रभावी रीतीने करता येते. या पद्धतीत संवाद व अभिनयाला विशेष महत्त्व असते.

३) मूकाभिनय: मूकाभिनय म्हणजे शब्दांचा वापर न करता हातवारे आणि हावभावांतून संदेश पोहोचवणे. मुकाभिनयाला इंग्रजीत पैन्टोमाइम (Pantomime) म्हणतात. मूकाभिनयाची सुरुवात प्राचीन ग्रीसमध्ये झाली होती. पैन्टोमिमस नावाच्या एकल नकाबपोश कलाकाराच्या नावावरून या नावाची निर्मिती झाली होती. मूकाभिनय, मुखमुद्रा, नेत्रप्रक्षेप याद्वारेच भाव आणि अर्थ स्पष्ट केले जातात. याबरोबरच नृत्यातील पदांच्या सस्वर पठणासोबतच विविध हस्तमुद्रांचे सादरीकरण केले जाते. या शैलीमध्ये केवळ विदुषकालाच बोलण्याचे स्वातंत्र्य असते. तो विविध पदांच्या अर्थाचे स्पष्टीकरण दर्शकासमोर सहज सोप्या भाषेमध्ये करतो.

जिल्हा स्तरीय स्पर्धा समिती :

अ. क्र.	पदनाम	समितीतील पद
१)	प्राचार्य जि. शि. व प्र. सं.	अध्यक्ष
२)	शिक्षणाधिकारी (प्राथ.)	उपाध्यक्ष
३)	शिक्षणाधिकारी (माध्य.)	उपाध्यक्ष
४)	वरिष्ठ अधिव्याख्याता/ अधिव्याख्याता	सदस्य
५)	गटशिक्षणाधिकारी	सदस्य
६)	मुख्याध्यापक	सदस्य
७)	विषय साधनव्यक्ती	सदस्य
८)	केंद्रप्रमुख	सदस्य
९)	अनुभवी भाषा तज्ज्ञ शिक्षक	सदस्य
१०)	वरिष्ठ अधिव्याख्याता /अधिव्याख्याता	सदस्य सचिव

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी स्पर्धा

१) स्पर्धेतील अपेक्षित स्पर्धक :रा. शै. सं.व प्र. प. महाराष्ट्र, जि. शि. प्र.प. आणि शिक्षण विभागातील पर्यवेक्षिय यंत्रणा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी .

२) सदर स्पर्धांच्या माध्यमातून शिक्षकांच्या कलागुणांना वाव देणे हा उद्देश आहे.

३) सदर स्पर्धा ह्या सर्वप्रथम केंद्र स्तरावर होतील.

४) केंद्र स्तरावरून प्रथम येणाऱ्या व्यक्तीस तालुका स्तरीय स्पर्धेत सहभाग घेता येईल.

५) तालुका स्तरावरून प्रथम येणाऱ्या व्यक्तीस/ विभागस्तरीय स्पर्धेत भाग घेता येईल.

६) विभाग स्तरावरून प्रथम येणाऱ्या व्यक्तीस राज्य स्तरीय स्पर्धेत पाठवण्यात येईल.

स्पर्धेचे नाव: नाटक / नाट्य स्पर्धा

स्पर्धेचा विषय :

पुढीलप्रमाणे विविध विषयांवर सदर स्पर्धा आयोजित करता येतील.

१) मादकद्रव्यांचा गैरवापर व प्रतिबंध

२) तरुणांमधील वाढती व्यसनाधीनता

३) जल है तो कल है।

४) समाजमाध्यमांच्या विळख्यात तरुणाई

५) लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

६) आणखी किती निर्भया?

७) साक्षरता.

नियमावली :

१) स्पर्धकांना एकल नाट्य अभिनय सादर करावा लागेल.
२) सादरीकरणासाठी वेशभूषा, केशभूषा विषयास अनुसरून असावी.
३) सादरीकरणासाठी वेळ ५ मिनिटे असा असेल.
४) स्पर्धकांना मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू यांपैकी कोणत्याही भाषेतून नाट्य अभिनय सादर करता येईल.
५) असंविधानिक शब्द व असंविधानिक भाषेचा वापर टाळावा.
६) हिंसा व वादात्मक आशय टाळावा.
७) स्क्रिप्ट स्वलिखित असावी दुसर्याची नसावी (दुसर्याची असल्यास संबंधितास त्याचे क्रेडिट द्यावे).
८) नाट्य सादारीकरणासाठीचे संपूर्ण साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावे. स्पर्धेच्या ठिकाणी कुठलेही साहित्य उपलब्ध करून दिले जाणार नाही.
९) शारीरिक हानिकारक व जीवघेणे प्रसंग टाळावेत.
१०) सादरीकरण हे स्पर्धकांना वैयक्तिक (०१ स्पर्धक) स्वरुपात (एकल स्वरुपात) करावयाचे आहे.
११) परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.
१२) स्पर्धेसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक राहील.
१३) स्पर्धा संकेत क्रमांकानुसार घेण्यात येतील.
१४) स्पर्धकाने स्पर्धेच्या वेळी स्वतःचे, शाळेचे, महाविद्यालयाचे, गावाचे, जिल्ह्याचे नाव सांगू नये.
१५) स्पर्धकासोबत स्वतःचे ओळखपत्र असणे बंधनकारक आहे.
१६) स्पर्धकाने स्पर्धेच्या ठिकाणी वेळेत उपस्थित राहावे.

स्पर्धेचे नाव :भूमिकाभिनय स्पर्धा

स्पर्धेचा विषय :

१) लिंगसमभाव
२) व्यसनाधीनतेवर मात
३) पाणी म्हणजे जीवन
४) समाजमाध्यमांचा सुजाण वापर
५) लोकसंख्या शिक्षण काळाची गरज
६) नारी का सम्मान करो। नियमावली
७) जन-जन साक्षर.

नियमवली:

१) स्पर्धकांना वैयक्तिक भूमिकाभिनय सादर करता येईल.
(टीप: नियम क्र. २ ते १६ हे नाटक /नाट्य स्पर्धेप्रमाणेच राहतील.)

स्पर्धेचे नाव : मूकाभिनय स्पर्धा

स्पर्धेचा विषय :

१) मादक द्रव्ये जीवनास बाधक.
२) वृक्ष वाचवा, जीवन वाचवा .

३) समाजमाध्यमांचे (Social media)दुष्परिणाम.
४) सुरक्षित स्त्री, सुरक्षित समाज.
५) बाल लैंगिक अत्याचार.
६) स्त्री भ्रुण हत्या.
७) लिंग समभाव.
८) अस्वच्छ परिसर रोगाचे माहेरघर.
९) प्रदूषण

नियमावली :

१) स्पर्धकांना वैयक्तिक मूकाभिनय सादर करता येईल.
(टीप : नियम क्र. २ ते १६ हे नाटक / नाट्य स्पर्धेप्रमाणेच राहतील.)

पारितोषिकाचे स्वरूप

स्पर्धा: नाट्य / नाटक, मूकाभिनय तसेच भूमिकाभिनय (वैयक्तिक)

अ. क्र.	स्तर	प्रथम क्रमांक	बक्षिसाचे स्वरूप	
१)	केंद्र स्तर	शासकीय निर्देश व नियमानुसार तरतूद प्राप्त झाल्यासच.	प्रमाणपत्र	सन्मानचिन्ह
२)	तालुका स्तर		प्रमाणपत्र	सन्मानचिन्ह
३)	विभाग स्तर		प्रमाणपत्र	सन्मानचिन्ह
४)	राज्य स्तर		प्रमाणपत्र	सन्मानचिन्ह

(टीप : उपरोक्त स्पर्धांसाठी पारितोषिकाचे स्वरूप शासन निर्देशानुसार राहील.)

नाट्य, भूमिकाभिनय, मुकाभिनय (वैयक्तिक)

परीक्षक:

उपरोक्त स्पर्धेसाठी केवळ तीन परीक्षक नेमावेत.

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

मूल्यांकन निकष प्रपत्र :

नाट्य / नाटक व भूमिकाभिनय

तालुका व विभागाचे नाव: _____

अ. क्र.	नाव/संकेतांक क्र.	जिल्हा	विषय	संहिता (प्रभावीपणा आणिआकर्षकता, आशय, कथा, संवाद,)	हावभाव प्रकटीकरण (स्पष्टता, भावनांची तीव्रता, समय सूचकता, देहबोली इ.)	वेशभूषा व रंगभूषा (property चा वापर, रंगमंच व्यवस्थापन, संगीत, प्रकाशयोजना)	सादरीकरण शैली (भूमिकेशी समरूपता, सहजअभिनय)	एकूण परिणाम (प्रेक्षकांचा प्रतिसाद,वेळेचे व्यवस्थापन, मूळ संकल्पनेचे जतन)	एकूण
				15	30	20	20	15	100

परीक्षकाचे नाव, पदनाम, कार्यालयाचे नाव व स्वाक्षरी.

परीक्षक १ परीक्षक २ परीक्षक ३

मूल्यांकन निकष प्रपत्र :

मुकाभिनय

तालुका व विभागाचे नाव: _____

अ. क्र.	नाव/संकेतांक क्र.	जिल्हा	विषय	संहिता (प्रभावीपणा आणिआकर्षकता, आशय, कथा, मूक-संवाद,)	हावभाव प्रकटीकरण (स्पष्टता, भावनांची तीव्रता, समय सूचकता, देहबोली इ.)	वेशभूषा व रंगभूषा (property चा वापर, रंगमंच व्यवस्थापन, संगीत, प्रकाशयोजना)	सादरीकरण शैली (भूमिकेशी समरूपता, सहजअभिनय)	एकूण परिणाम (प्रेक्षकांचा प्रतिसाद,वेळेचे व्यवस्थापन, मूळ संकल्पनेचे जतन)	एकूण
				10	30	20	20	20	100

परीक्षकाचे नाव, पदनाम, कार्यालयाचे नाव व स्वाक्षरी.

परीक्षक १ परीक्षक २ परीक्षक ३

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था.....

तालुकास्तरीय स्पर्धा निकाल प्रपत्र

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

अ.क्र.	स्पर्धकाचे नाव	जिल्हा	तालुका	केंद्र	शाळेचे नाव	मोबाईल क्रमांक	स्पर्धेतील क्रमांक
१							
२							
३							

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था.....

विभागस्तरीय स्पर्धा निकाल प्रपत्र

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

अ.क्र.	स्पर्धकाचे नाव	विभाग	जिल्हा	तालुका	केंद्र	शाळेचे नाव	मोबाईल क्रमांक	स्पर्धेतील क्रमांक
१								
२								
३								

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था.....

राज्यस्तरीय स्पर्धा निकाल प्रपत्र

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

अ.क्र.	स्पर्धकाचे नाव	विभाग	जिल्हा	तालुका	केंद्र	शाळेचे नाव	मोबाईल क्रमांक	स्पर्धेतील क्रमांक
१								
२								
३								

Principal
District Institute Of Education
& Training Akola

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

खर्चाचे अंदाजपत्रक

तालुकास्तरीय खर्च अंदाज पत्रक (प्रती तालुका खर्च)

अ.क्र.	तपशील	खर्च	एकूण
१	परीक्षक मानधन	प्रती परीक्षक ५००/- (तीनपरीक्षक- १५००/-) रुपये	१५००/-
२	साउंड सिस्टीम व स्टेज व्यवस्था	२५००/-रुपये	२५००/-
३	स्पर्धकांसाठी चहा व पाणी	एकत्रित खर्च ५००/- रुपये	५००/-
४	प्रमाणपत्र	१००/- रुपये	१००/-
एकूण			**४६००/-**

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

खर्चाचे अंदाजपत्रक

विभागस्तरीय खर्च अंदाज पत्रक (प्रती स्पर्धा)

अ.क्र.	तपशील	खर्च	एकूण
१	परीक्षक मानधन	प्रती परीक्षक ५००/- (तीनपरीक्षक- १५००/-) रुपये	१५००/-
२	साउंड सिस्टीम व स्टेज व्यवस्था	४०००/-रुपये	४०००/-
३	स्पर्धकांसाठी चहा व पाणी	एकत्रित खर्च २०००/- रुपये	२०००/-
४	प्रमाणपत्र	१०००/- रुपये	१०००/-
एकूण			**८५००/-**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था .....

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

खर्चाचे अंदाजपत्रक

राज्यस्तरीय खर्च अंदाज पत्रक

अ.क्र.	तपशील	खर्च	एकूण
१	परीक्षक मानधन	प्रती परीक्षक १०००/- (तीन परीक्षक- ३०००/-) रुपये	३०००/-
२	साउंड सिस्टीम व स्टेज व्यवस्था इत्यादी	१००००/-रुपये	१००००/-
३	स्पर्धकांसाठी चहा, पाणी व भोजन	एकत्रित खर्च ४००००/- रुपये	४००००/-
४	प्रमाणपत्र	१०००/- रुपये	१०००/-
एकूण			५४०००/-

Principal
District Institute Of Education
& Training Akola

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

स्पर्धेचे संभाव्य नियोजन

अ.क्र.	वार व दिनांक	स्पर्धेचे नाव	आयोजक जिल्हा	नोव्हेंबर	डिसेंबर	जानेवारी
				तालुकास्तर	विभागस्तर	राज्यस्तर
१	तिसरा शनिवार	नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय	अकोला	नोव्हेंबर अखेर पर्यंत columm २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धेतील एक विजेता निवडणे)स्पर्धा आयोजन (दिनांक २२ नोव्हेंबर २०२५)	डिसेंबर अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धेतील ५ विजेते निवडणे. स्पर्धा आयोजन (दिनांक २० डिसेंबर २०२५)	जानेवारी अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धेतील १० विजेते निवडणे.)स्पर्धा आयोजन (दिनांक १७ जानेवारी २०२६.)

Principal
District Institute Of Education
& Training Akola

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

तालुकास्तर/URC स्तर स्पर्धा आयोजन समिती

अ. क्र.	समिती सदस्य नाव	सदस्याचे पदनाम	समितीतील सदस्य
1		गटशिक्षणाधिकारी/शिक्षणाधिकारी मनपा	अध्यक्ष तथा तालुका समन्वयक
2		तालुका संपर्क अधिकारी (DIET)	सहाय्यक समन्वयक
3		स्थानिक पोलीस स्टेशन प्रतिनिधी	सदस्य
4		केंद्रप्रमुख प्रतिनिधी	सदस्य
5		विषय साधन व्यक्ती प्रतिनिधी	सदस्य
6		स्थानिक नाट्यकर्मी/नाट्य कलाकार	सदस्य
7		तालुका शिक्षक संघटना प्रतिनिधी	सदस्य
8		तालुका विस्तार अधिकारी (शिक्षण)	सदस्य सचिव

Principal
District Institute Of Education
& Training Akola

स्पर्धेचे नाव:- नाट्य / नाटक व भूमिकाभिनय/ मुकाभिनय

जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजन समिती:-

अ. क्र.	समिती सदस्य नाव	पदनाम	समितीतील पद
1.		प्राचार्य,DIET अकोला	अध्यक्ष
2.		शिक्षणाधिकारी (प्राथमिक)	उपाध्यक्ष
3.		शिक्षणाधिकारी (माध्यमिक)	उपाध्यक्ष
4.		वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता	सदस्य
5.		गटशिक्षणाधिकारी	सदस्य
6.		मुख्याध्यापक, जी.प.शाळा क्र.2 मलकापूर, प. स.अकोला	सदस्य
7.		विषय साधन व्यक्ती,BRC अकोला	सदस्य
8.		केंद्रप्रमुख, प.स.बाळापूर	सदस्य
9.		अनुभवी भाषा तज्ञ शिक्षक	सदस्य
10.		वरिष्ठ अधिव्याख्याता अधिव्याख्याता	सदस्य सचिव

Principal
District Institute Of Education
& Training Akola